सकाळ

सकाळ
मुंबई, गुरुवार,
६ फेब्रुवारी २०१४



## शेअर गैरव्यवहार

# आरोपींकडून ६ हजार कोटींची वसुली

## बारा हजार प्रकरणे निकाली

कृष्ण जोशी : सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. ५ : हर्षद मेहताचा सहभाग असलेल्या शेअर घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या विशेष न्यायालयाने आरोपींकडून (नोटिफाईड पार्टी) आतापर्यंत सहा हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची वसुली केली आहे. न्यायालयाने या घोटाळ्यातील बारा हजार प्रकरणे निकाली काढली आहेत.

आतापर्यंत या न्यायालयाने आरोपींकडून (नोटिफाईड पार्टी) सहा हजार तीनशे कोटी रुपये वसूल करून त्यातील पाच हजार ६८८ कोटी ५७ लाख केंद्र सरकारला परत दिले. ६१२ कोटी आठ लाख रुपये अजूनही बॅंक खात्यांमध्ये आहेत. रोखे गैरव्यवहारांशी संबंधित १२ हजार ३४० दिवाणी प्रकरणे आतापर्यंत सादर करण्यात आली, त्यातील बारा हजार प्रकरणे निकाली काढण्यात आली. अद्याप अडीचशे दिवाणी प्रकरणे शिल्लक आहेत. ४३ फौजदारी खटल्यांपैकी ३४ प्रकरणे निकाली निघाली, दोन प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात तर अजून सात प्रकरणे विशेष न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यांची व्याप्ती पाहता ती संपण्यास अजून काही वर्षे तरी लागण्याची शक्यता आहे.

हर्षद मेहता, अश्विन मेहता, हितेश मेहता, हितेन दलाल, भूपेन दलाल, दीपक मेहता, केतन पारेख, पल्लव शेठ, जितेंद्र श्रॉफ आदींविरुद्ध ही प्रकरणे चालविण्यात आली. या न्यायालयावर आतापर्यंत सॅम वारियावा, एम. एस. राणे, सरोश कपाडिया, डी. के. त्रिवेदी, ए. बी. पालकर, एस. के. शहा, डी. के. देशमुख, एस. आर. साठे, जे. एच. भाटिया, आर. सी. चव्हाण या उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी काम केले आहे. सध्या न्या. विद्यासागर कानडे व न्या. रोशन दळवी यांच्यावर ही जबाबदारी आहे. विशेष म्हणजे या सर्व न्यायमूर्तींनी आपली उच्च न्यायालयातील नेहमीची न्यायदानाची कामे तसेच प्रशासकीय कामे सांभाळून हे विशेष न्यायालयाचे शिवधनुष्य पेलले आहे. त्यांना श्रीराम कापसे, शिरीष आगटे, मुकुंद महाबळेश्वरकर आदी अधिकाऱ्यांनी साह्य केले.

या गैरव्यवहारात अडकलेले सामान्यांचे शेअर्स त्वरेने परत मिळावेत, यासाठी या न्यायालयाने पहिल्यापासून वेगळी पद्धती (सर्टिफिकेशन प्रोसेस) अवलंबली होती. क्लिष्ट तांत्रिक मुद्यांवर भर न देता ही पद्धत सोपी करण्यात आली. त्यांचे अर्ज ऐकण्यासाठी त्या अर्जदारांना मुंबईत न येता त्यांचे शेअर्स परत मिळत होते. त्यामुळे अजूनही अनेक लोक असे अर्ज करीत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आतापर्यंत असे आठ लाख शेअर्स संबंधितांना परत देण्यात आले.

### विशेष न्यायालयाची वेबसाईट

**अब्जावधी रुपयांची व्याप्ती असलेल्या या घोटाळ्यात नेमक्या किती रकमेचा गैरव्यवहार झाला, हे अजूनही कोणाला शोधून काढता आले नाही. मात्र १९९२ सालपासून मुंबई उच्च न्यायालयात चालणाऱ्या या विशेष न्यायालयाने चिकाटीने आपले काम सुरुच ठेवले. आतापर्यंत केलेल्या कामाची जनतेला माहिती मिळावी, म्हणून नुकतीच या विशेष न्यायालयाची वेबसाईटही सुरू करण्यात आली.**